॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ५ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाअंतर्गत महाराष्ट्रात प्रथमच दिल्ली येथील इलेक्ट्रॉनिक्स सेक्टर स्कील कौन्सिल ऑफि इंडिया (ESSCI, Delhi) यांच्या सहकार्याने **विद्यापीठात भौतिकशास्त्र प्रशाळेत बी.एस्सी. (ऑनर्स ) इलेक्ट्रॉनिक्स** हा नाविन्यपूर्ण  चारवर्षीय पदवी अभ्यासक्रम सुरु झाला असून त्यांची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे.

स्थानिक आणि देशपातळीवरील इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रांच्या उद्योगांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख शिक्षण मिळावे ह्या हेतूने हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. औद्योगिक इलेक्ट्रॉनिक्स या मुख्य विषयासह डाटा सायन्स किंवा  सौर उर्जा – प्रणाली या विषयांत विद्यार्थी कौशल्य प्राप्त करू शकतात. चार वर्षाच्या या अभ्यासक्रमात, विद्यार्थ्यांनी शेवटच्या म्हणजे चौथ्या वर्षात एखाद्या उद्योगक्षेत्रात कामाचा अनुभव घेणे अपेक्षीत आहे. भारत सरकारच्या उपक्रमांतर्गत या विद्यार्थ्यांना पाठ्यवृत्ती मिळवण्याची म्हणजेच शिकता शिकता कमवण्याची सुध्दा संधी आहे.विशेष म्हणजे जळगाव परिसरातील नामांकित उद्योगांतील तज्ज्ञ यांच्या सूचना विचारात घेवून अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. भविष्यकाळातील इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रांच्या उद्योगक्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची मागणी लक्षात घेता या अभ्यासक्रमाद्वारे कुशल विद्यार्थ्यांना उद्योगांत रोजगारांचीकिंवा स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध होवू शकते.

**या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी  महाराष्ट्र राज्याची १२ वी सायन्स परीक्षा उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे. बुधवार दि. ९ जुलै, २०२५ रोजी या अभ्यासक्रमाच्या प्रवेशास विद्यापीठातील इलेक्ट्रॉनिक्सविभागात प्रवेश निश्चिती होणार आहे.** इच्छुक विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह विद्यापीठातील **भौतिकशास्त्र प्रशाळे**तील (इलेक्ट्रॉनिक्स ) विभागाला भेट देवून आपला प्रवेश निश्चित करू शकतात. **अधिक माहितीसाठी प्रवेश समन्वयक श्री. एम.एस. नेतकर यांचेशी मो. क्र. ९४२२३३८१३२ वर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.**

**बातमी क्र. २**

जळगाव दि. ५ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन विभागाद्वारे बहि:स्थ  पध्दतीने **पदव्युत्तर एम.ए. (मराठी,हिंदी, इंग्रजी, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, संरक्षण व सामरिकशास्त्र, मानसशास्त्र (समुपदेशन),शिक्षणशास्त्र) तसेच एम.कॉम. शिक्षणक्रमांचे ऑनलाईन प्रवेश दि. ७ जुलै पासून सुरु झालेले आहेत.**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-2020)नुसार, नोकरी / व्यवसाय करतांना बाहेरून उच्च शिक्षण घेण्याची सुवर्णसंधी, पाठ्यक्रम व आणि पदवी विद्यापीठाचीच, सत्र (सेमिस्टर) पध्दती, जळगाव, धुळे व नंदुरबारजिल्ह्यात परीक्षा केंद्राची सुविधा, प्रवेश ते पदवी प्रदान अंतर्गत ऑनलाईन अंमलबजावणी प्रक्रिया, सर्व विषयांचे स्वयं अध्ययन साहित्य ई- स्वरूपात उपलब्ध,विविध  स्पर्धा परीक्षा, पीएच.डी. , नोकरीसाठी पदवीस मान्यता आणि समान संधी, रविवारी तसेच सुट्टीच्या दिवशी संमंत्रण सत्रांचे हायब्रीड पध्दतीने आयोजन करण्यात येणार आहे. अधिक माहीतीसाठी 0257-2257495, 2258496, Website http://nmu.ac.in/external-education यावर संपर्क साधावा. असे आवाहन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील यांनी केले आहे.

......................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ७ जुलै, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता